• Registered • Date of Publication : शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.



दोस्तांनो, दरवर्षी इंडियन प्रीमिअर लीगच्या (आयपीएल) सामन्यांमध्ये विविध विक्रम होतात, मोडले जातात आणि पुन्हा नव्याने होतात. त्यात काही जुने, जाणते विक्रमवीर असतात, तर काही चेहरे मात्र अगदीच अपरिचित, नवे असतात. 'आयपीएल' हे आता अनेक युवा खेळाडूंसाठी राष्ट्रीय संघात सहभागी होण्याचे प्रवेशद्वार झाले आहे. 'आयपीएल'मध्ये मिळालेल्या संधीचे सोने करण्यासाठी आता आणखी एका युवा खेळाडूने 'दमदार एन्ट्री' घेतली आहे. तो आहे आपल्या महाराष्ट्रातील नागपूरचा प्रफुल्ल हिंगे!

# दमदार एन्ट्री







## 'एन्ट्री'लाचा विक्रम

'आयपीएल'च्या आजवरच्या १९ वर्षांच्या इतिहासात न घडलेला विक्रम प्रफुल्लने नुकत्याच झालेल्या राजस्थानविरुद्ध सनरायझर्स हैदराबादच्या सामन्यात करून दाखवला. त्याने सामन्याच्या पहिल्याच षटकात तीन बळी घेण्याची किमया केली. विदर्भाकडून रणजी स्पर्धेत खेळणाऱ्या नागपूरच्या २४ वर्षीय प्रफुल्लची ही कामगिरी टीव्हीवर 'लाइव्ह' पाहिल्यावर त्याच्या आई-वडिलांना खूप आनंद झाला व त्याच्या परिसरातील, म्हणजेच नंदनवन भागातील स्थानिकांनी एकच जल्लोष केला. या अद्वितीय कामगिरीनंतर त्याच्या घरी शुभेच्छा देण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली.

**उंचापुरा असलेल्या प्रफुल्लने अखेर मेहनतीच्या जोरावर आधी १६ व नंतर १९ वर्षांखालील संघात स्थान मिळविले.**

## रेशीमबाग ते आयपीएल

तब्बल १२ वर्षांपूर्वी नागपूरमधील रेशीमबागेच्या मैदानावर प्रफुल्लने क्रिकेटचे प्रशिक्षण घेऊन सराव सुरू केला. मेहनत, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर तो आधी रणजी व आता 'आयपीएल'पर्यंत जाऊन पोहोचला. या प्रवासात त्याच्या कुटुंबीयांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांनी त्याला वेळोवेळी पाठिंबा दिला. त्यातही सर्वाधिक मदत त्याची मोठी बहीण प्रगती हिने केली. ती स्वतः सीए असून, मुंबईत नोकरी करते. प्रफुल्लने त्याच्या आवडीच्या क्षेत्रात उज्ज्वल करिअर करावे हीच तिची इच्छा आहे.

**"रेशीमबाग जिमखान्यापासून सुरू झालेला प्रफुल्लचा प्रवास 'आयपीएल'पर्यंत पोहोचला आहे. गेल्या दोन वर्षांपासून तो 'आयपीएल'मधील संधीसाठी प्रयत्न करीत होता. यंदा ती संधी मिळाली व या संधीचे त्याने सोने केले याचा आम्हाला आनंद वाटतो.**
**- प्रकाश हिंगे,**
**प्रफुल्लचे वडील**



## प्रशिक्षणाची सुरुवात

रेशीमबाग जिमखान्यातील क्रिकेट प्रशिक्षक शिशिर सुदामे यांच्या उन्हाळी शिबिरात प्रफुल्ल पहिल्यांदा दाखल झाला. तिथे सुदामे यांच्यासह अन्य काही प्रशिक्षक व वरिष्ठ खेळाडूंचे मार्गदर्शन त्याला मिळत गेले. थोड्याच कालावधीत त्याने आपली चुणूक दाखवली व त्याला महत्त्वाच्या सामन्यांमध्ये खेळण्याची संधी मिळू लागली.

## वरुण ॲरोनने हेरली गुणवत्ता

गेल्या वर्षी तमिनाळडूविरुद्धचा रणजी सामना सुरू असताना सनरायझर्स हैदराबाद संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक वरुण ॲरोन हे समालोचन करत होते. ते प्रफुल्लची गोलंदाजी पाहून खूपच प्रभावित झाले आणि त्याला तत्काळ हैदराबाद संघाच्या 'ट्रायल्स'साठी येण्यास सांगितले. तिथेही त्याने अचूक गोलंदाजी करत पाच बळी घेतले व आपल्या कामगिरीने सर्वांनाच प्रभावित केले. ज्या वेळी प्रफुल्ल हैदराबाद संघाची 'ट्रायल्स' देत होता, त्या वेळी त्याच्या बहिणीच्या लग्नाचे रिसेप्शन होते. त्यामुळेच तो रिसेप्शनला उपस्थित नव्हता.

## मॅकग्राकडून प्रशिक्षण

जबरदस्त वेग, अचूक टप्प्यावर गोलंदाजी आणि दोन्ही बाजूंनी 'स्विंग' करण्याची कला अवगत असल्याने प्रफुल्लला 'एमआरएफ'ची शिष्यवृत्ती मिळाली होती. या जोरावरच त्याला २०२२ मध्ये ऑस्ट्रेलियाचा महान गोलंदाज ग्लेन मॅकग्राच्या अकादमीत स्वतः मॅकग्राच्या मार्गदर्शनाखाली सराव करण्याची संधी मिळाली होती. त्या संधीचा त्याने पुरेपूर उपयोग करून घेतला व आपल्या गोलंदाजीत महत्त्वपूर्ण बदल केले.

1 W 0 W 0 W



## रणजीत निवड

**रणजी क्रिकेट खेळण्यासाठी प्रफुल्लने प्रयत्न सुरू केले. सुरुवातीला त्याला अपयश आले.**

**विदर्भाच्या १६ वर्षांखालील निवड चाचणीत त्याला पहिल्या प्रयत्नात अपयश आले. मात्र, तो खचला नाही.**

**२०२४ मध्ये पुदुच्चेरीविरुद्धच्या सामन्याद्वारे त्याने रणजी क्रिकेटमध्ये पदार्पण केले.**

**दोस्तांनो, मागील लेखांमधून आपण बँकेतील बचत खाते (सेव्हिंग अकाउंट) व चालू खाते (करंट खाते) या दोन खात्यांची माहिती घेतली. या दोन्हीही खात्यात ठेवल्या जाणाऱ्या ठेवींना 'डिमांड डिपॉझिट' असे म्हणतात. कारण, खातेदाराने मागणी केल्यावर त्यातील संपूर्ण रक्कम अथवा शिल्लक रकमेपैकी काही रक्कम संबंधित खातेदारास हवी तेव्हा बँकेत जाऊन अथवा 'एटीएम'द्वारा रोख काढता येते, तसेच चेकने किंवा डिजिटल पद्धतीने पेमेंटसाठी वापरता येते. याउलट बँकेत आपल्याला आपली रक्कम काही ठरवीक मुदतीसाठी ठेवता येते अशा खात्यास मुदत ठेव खाते असे म्हणतात. आज आपण अशा मुदत ठेव खात्यांची माहिती घेऊया.**

अर्थमंत्र

सुधाकर कुलकर्णी

# मुदत ठेव खाती



## वैशिष्ट्य

मुदत खात्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे या खात्यात ठेवली जाणारी रक्कम काही ठरावीक कालावधीसाठी ठेवली जाते व सामन्यत: ही रक्कम मुदतीपूर्वी काढली जात नाही. काही कारणांसाठी रकमेची गरज भासल्यास असे खाते मुदतपूर्व बंद करून रक्कम परत दिली जाते, मात्र असे करताना व्याज कमी मिळते, तर काही वेळा रकमेची गरज तात्पुरती असेल तर ठेव रकमेच्या ८० टक्के रकमेपर्यंत ठेव पावती तारण ठेवून कर्ज घेता येते.






## प्रकार

**ठेव खात्याचे प्रामुख्याने खालील प्रकार आहेत -**
**१) अल्प मुदत ठेव खाते (शॉर्ट टर्म डिपॉझिट)**
**२) मुदत ठेव खाते (टर्म डिपॉझिट)**
**३) पुनरावर्ती ठेव खाते (रिकरिंग डिपॉझिट)**

### १) अल्प मुदत ठेव खाते (शॉर्ट टर्म डिपॉझिट) :

या खात्याची मुदत किमान ७ दिवस व कमाल ३६४ दिवस इतकी असते. आपल्याकडील शिल्लक रकमेची गरज जर अल्प काळासाठी नसेल, तर त्यानुसार थोड्या कालावधीसाठी ती रक्कम बँकेत अल्प मुदत ठेव खात्यात (शॉर्ट टर्म डिपॉझिट) ठेवता येते. या खात्याची मुदत साधारणपणे १ महिना, २ महिने, ३ महिने, ६ महिने, ९ महिने किंवा ४५ दिवस, २७५ दिवस अशी असते. मात्र, हा कालावधी आपण आपल्या सोयीनुसार ठरवू शकतो. या ठेवीवर मिळणारे व्याज सध्या ३.५% ते ६% च्या दरम्यान असून, जितका कालावधी जास्त, तितके व्याज जास्त असते. हे व्याजदर कालावधीनुसार व बँकेनुसार कमी-अधिक असल्याचे दिसून येते.

### २) मुदत ठेव खाते (टर्म डिपॉझिट)

या खात्याची मुदत १ वर्षे ते १० वर्षे इतकी असू शकते. साधारणपणे या खात्यात ३ ते ५ वर्षे मुदतीने ठेव ठेवली जास्त असल्याचे मोठ्या प्रमाणावर दिसून येते. मुदत ठेव खात्यातील रकमेवर मासिक, तिमाही, सहामाही व वार्षिक पद्धतीने व्याज दिले जाते. आपण आपल्या गरजेनुसार पर्याय निवडू शकतो. तसेच, जर आपल्याला या पद्धतीने व्याज न घेता व्याज आणि मुद्दलासहित एकत्रित रकम मुदतीनंतर हवी असेल, तर हाही पर्याय उपलब्ध असतो. या पर्यायाला संचयी मुदत ठेव (क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट) असे म्हणतात. सध्या मुदत ठेवीवरील व्याजाचे दर ६% ते ७.५०% च्या दरम्यान असून, कालावधीनुसार व बँकेनुसार कमी अधिक असल्याचे दिसून येते. आपली शिल्लक रक्कम जर काही ठरवीक कालावधीनंतर हवी असेल, तर अशी रक्कम बचत खात्यात न ठेवता आपल्या गरजेनुसार मुदत ठेव खात्यात ठेवणे हितावह असते. गरज पडली तर वर उल्लेखल्याप्रमाणे ठेव मुदतीच्या आधी मोडता येते किंवा आपल्या ठेव पावतीवर ८० टक्क्यांपर्यंत कर्ज घेता येते.

### ३) पुनरावर्ती ठेव खाते (रिकरिंग डिपॉझिट)

ही अशी एक ठेव योजना आहे की, ज्यामध्ये आपण दरमहा काही ठरावीक रक्कम एका ठरावीक तारखेला एका ठरावीक मुदतीसाठी ठेवू शकतो. उदा - आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी आर्थिक तरतूद करायची असेल, तर आपण दरमहा आपल्याला शक्य असलेली रक्कम एका ठरावीक तारखेला (समजा दर महिन्याची ५ तारीख) १२, २४, ३६, ४८, ६० महिने या पद्धतीने शिल्लक टाकू शकतो. गुंतवणुकीचा कालावधी, रक्कम व तारीख आपण आपल्या सोयीनुसार ठरवू शकतो, मात्र सुरुवातीस ठरवलेली रक्कम कालावधी संपेपर्यंत तीच राहते. या खात्याचा उपयोग प्रामुख्याने आपल्या नजीकच्या भविष्यातील गरजा पूर्ण करता याव्यात यासाठी केला जातो. या खात्यातील शिल्लक रकमेवर मुदत ठेवीच्या दराने कालावधीनुसार व्याज दिले जाते. हे खातेसुद्धा गरज पडल्यास मुदतीच्या मोडता येते किंवा शिल्लक रकमेच्या ८० टक्क्यांपर्यंत कर्ज घेऊन आपली गरज भागवता येते. या खात्यामुळे आर्थिक शिस्त लागते.

---

**दोस्तांनो, निसर्गातील विविध सौंदर्यस्थळे पाहण्यासाठी, गड-किल्ल्यांवर फिरण्यासाठी, मानवनिर्मित उत्कृष्ट वास्तू पाहण्यासाठी, धार्मिक स्थळांचे दर्शन घेण्यासाठी आपण सुट्टीत विविध ठिकाणी जातो. मात्र, या सर्व ठिकाणांबरोबरच आणखी एका महत्त्वाच्या ठिकाणी जायला हवं, ते म्हणजे वस्तूसंग्रहालय अर्थात 'म्युझियम'! आपल्या देशाला लाभलेला उज्ज्वल इतिहास, निसर्गाची विविधता आणि भौगोलिक सौंदर्य जतन करणारी, त्यांची माहिती देणारी अनेक संग्रहालये आपल्या देशात व महाराष्ट्रातही आहेत. तुम्ही ती पाहिली आहेत का?**

भटकंती

# समृद्ध वारशाची प्रतीके





## इतिहास

- सतराव्या शतकापूर्वी जगातील संग्रहालयांमध्ये कलात्मक वस्तूंचा संगह जास्त प्रमाणात केला जायचा. संग्रहालयांचं महत्त्व लक्षात आल्यावर नंतरच्या ३०० वर्षांत विविध संस्था स्थापन झाल्या.
- १९७५ साली जगात सुमारे २५,००० पेक्षा जास्त संग्रहालये होती.
- संग्रहालयांचे तीन प्रमुख प्रकार - कलाविषयक, इतिहासविषयक आणि विज्ञान व तंत्रविद्या संग्रहालये. याशिवाय काही सर्वसामान्य संग्रहालयेदेखील असतात.
- आता कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित 'आभासी संग्रहालये'देखील आले आहे.
- याशिवाय काही एकाच विषयाला वाहिलेली किंवा फक्त मुलांसाठीचीदेखील संग्रहालये आहेत. त्यांत इंग्लंडमधील नॅशनल रेल्वे म्युझियम, स्कॉटलंडमधील म्युझियम ऑफ चाइल्डहूड, एडिंबरोमधील कलेक्शन ऑफ ओल्ड टॉइज वगैरे प्रसिद्‌घ आहेत.

## महत्त्व


- दुर्मीळ वस्तू व कागदपत्रांचे जतन होते. सामान्य नागरिकांना अशा वस्तू पाहता येतात व त्यांची माहिती घेता येते.
- नवीन पिढीला हजारो वर्षांचा इतिहास अचूकपणे कळतो. प्रेरणा मिळते.
- संदर्भासाठी संग्रहालयांचा मोठा उपयोग होतो.


## महाराष्ट्रातील महत्त्वाची संग्रहालये


- **छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई :** राज्यातील सर्वांत मोठे संग्रहालय. प्राचीन कलाकृती, शस्त्रे आणि शिल्पांचा समावेश.
- **डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालय, भायखळा :** मुंबईतील सर्वांत जुने संग्रहालय.
- **नॅशनल मेरिटाइम म्युझियम, मुंबई :** भारतीय नौदलाचा इतिहास.
- **राजा दिनकर केळकर संग्रहालय, पुणे :** शस्त्र, शिल्प व इतर अनेक कलात्मक वस्तू.
- **आगाखान पॅलेस, पुणे :** महात्मा गांधींचे वास्तव्य लाभलेले स्थान.
- **जोशी म्युझियम ऑफ मिनिएचर रेल्वे, पुणे :** लहान मुलांसाठी आणि रेल्वेप्रेमींसाठी लोकप्रिय.
- **ब्लेड्स ऑफ ग्लोरी क्रिकेट म्युझियम, पुणे :** क्रिकेटविषयक नानाविध वस्तू व माहिती.
- **महात्मा फुले संग्रहालय, पुणे :** ऐतिहासिक वस्तू.
- **मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर :** विदर्भातील सर्वांत जुने संग्रहालय.
- **सोनेरी महाल, छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा विद्यापीठ परिसरातील ऐतिहासिक संग्रहालय.
- **गारगोटी संग्रहालय, सिन्नर-नाशिक :** दुर्मीळ खनिजे आणि रत्न.
- **सिद्धगिरी संग्रहालय, कोल्हापूर :** ग्रामीण जीवनाचे दर्शन.
- **न्यू पॅलेस, कोल्हापूर :** कोल्हापूर राजघराण्याची माहिती व वस्तू.
- **कॅव्हलरी टँक म्युझियम, अहिल्यानगर :** रणगाडा संग्रहालय.

## लक्षात ठेवा...

- दरवर्षी किमान २ ते ३ संग्रहालयांना भेट द्या व त्यांची माहिती घ्या.
- तुमच्या शहरातील किंवा जिल्ह्यातील संग्रहालयाला भेट देऊन तेथील कामकाज कसे चालते, हे जाणून घ्या.
- 'संग्रहालयशास्त्र' या विषयात पदवी घेऊन त्यात करिअरही करता येते. तुम्ही इच्छुक असाल तर त्याबाबत अधिक जाणून घ्या.


MATH MAZE
Find the way through the maze
by following the numbers in order from 1 to 18.
16


FIND THE RIGHT PATH


How many
1 2 3 4 5 6 7 8 9
Can you help the worker find his tools?
Count the quantity and write the numbers


Find identical

चित्र रंगवा.




How many insects
are hiding in the garden?


Christmas games. Find 10 differences.

**दोस्तांनो आपण आपल्या ‘स्क्रीन टाइम’ या सदरात एका घोड्याच्या स्वातंत्र्याच्या ओढीची कहाणी असलेल्या ‘स्पिरिट- स्टॅलियन ऑफ द सिमॅरॉन ’ या चित्रपटाविषयी जाणून घेतले आहे. २००२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या चित्रपटाच्या संकल्पनेवर आधारित एक ॲनिमेटड मालिकाही आहे- ‘स्पिरिट रायडिंग फ्री’ (२०१७). धैर्य, मैत्री आणि स्वातंत्र्य या गोष्टींचे महत्त्व सांगणारी ही मालिकाही तुम्हाला नक्की आवडेल.**

# धैर्य, मैत्री व स्वातंत्र्याची गोष्ट ‘स्पिरिट रायडिंग फ्री’

कार्टूनची सफर

अरविंद रेणापूरकर





## तिन्ही प्रमुख पात्रे मुलीच

‘स्पिरीट रायडिंग फ्री’ ही कार्टून मालिका ‘ड्रीमवर्क्स ॲनिमेशन’ने निर्माण केली आहे. ५ मे २०१७ रोजी तिचा पहिला भाग प्रदर्शित झाला आणि पुढे तिचे ८ ‘सीझन्स’ बघायला मिळाले. ‘स्पिरिट- द स्टॅलियन ऑफ सिमॅरॉन’ हा २००२ मध्ये चित्रपट खूप लोकप्रिय झाला होता. त्या कथेवर आधारित असलेल्या या मालिकेची नायिका आहे ‘लकी प्रिस्कॉट’ ही धिटुकली मुलगी. ती अतिशय उत्साही आहे. धाडस आणि जिज्ञासूपणा हे गुण तिच्यात पुरेपूर आहेत. ती आणि तिच्या मैत्रिणी- प्रु ग्रॅन्जर आणि ॲबिगेल स्टोन तिघी घोडेस्वारी करतात. लकीकडे ‘स्पिरिट’ हा घोडा आहे, ॲबिगेलकडे ‘बूमरँग’ हा घोडा आहे, तर प्रुकडे ‘चिका लिंडा’ ही घोडी आहे. सर्व प्रमुख पात्रे ‘टीनएजर’ मुली असणे, हे या मालिकेचे एक वैशिष्ट्य आहे. लकी, प्रु आणि ॲबिगेल एकत्र मिळून खूप फिरतात, दुसऱ्यांना मदत करतात आणि अनेक नवीन गोष्टी शिकतात. या मालिकेतील ॲनिमेशन, पात्रांना दिलेले आवाज, संगीत या सगळ्याचेच मोठे कौतुक झाले होते. या मालिकेस ‘डे टाइम एमी’ पुरस्कारासाठी नामांकनही मिळाले आहे.

## चांगली मूल्येही

लकी प्रिस्कॉट ही एक आदर्श नायिका म्हणून आपल्यासमोर येते. तिचे धैर्य, साहसी वृत्ती आणि नि:स्वार्थीपणा प्रेरणादायक वाटतो. घोड्यांचे स्वातंत्र्य हा ‘स्पिरिट’च्या मूळच्या कथेत महत्त्वाचा असलेला पैलू याही मालिकेत आला आहे. या कथेतही लकीची स्पिरीट या घोड्याशी भेट होते, तेव्हा सुरुवातीला स्पिरीट कुणाला जवळ येऊ देत नाही. पण लकीचा प्रेमळ स्वभाव आणि प्रामाणिकपणा पाहून तो हळूहळू तिच्यावर विश्वास ठेवू लागतो. त्यांच्यात घट्ट मैत्री निर्माण होते. लोकांना आणि प्राण्यांनाही फसवणारे लोक खलनायक म्हणून या मालिकेत भेटतात. योग्य-अयोग्य, खरा-खोटा यांतील फरक ओळखा, असा संदेश त्यातून दिला आहे.



## मोहिम फत्ते!

या मालिकेत लकी आणि मैत्रिणी प्राण्यांना मदत करतात. ‘लकी अँड द वाइल्ड हॉर्सेस’ या भागात गावाजवळील घोड्यांना काही लोक पकडून विकण्याचा प्रयत्न करतात. लकी त्यांना वाचवण्याचा निर्णय घेते. प्रु आणि ॲबिगेल यांना बरोबर घेऊन ती एक योजना आखते. तिघी मिळून घोड्यांना सुरक्षित ठिकाणी नेण्याचा प्रयत्न करतात. या प्रवासात त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. खलनायक त्यांचा पाठलाग करतात, रस्ताही खडतर असतो आणि लवकरात लवकर सुरक्षित ठिकाणी पोहोचणे आवश्यक असते. एकजुटीने काम करून लकी आणि मैत्रिणी संकटांतून मार्ग काढतात. स्पिरीट त्या घोड्यांना शांत ठेवण्यासाठी मदत करतो. शेवटी सर्व घोड्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्यात त्यांना यश मिळते. मोहिम फत्ते होते! मालिकेचा हा भाग अतिशय लोकप्रिय आहे.

---

ओळख उद्योजकांची

# सर्वांत तरुण अब्जाधीश

**दोस्तांनो, आपण गेल्या काही महिन्यांपासून देशातील विविध उद्योजकांची माहिती घेत आहोत. त्यावरून आपल्याला हे लक्षात आलं आहे की, उद्योजकता आणि त्यातून मिळणारं यश हे वयावर अवलंबून नसते, तर ते तुमच्या बुद्धिमत्तेवर, कर्तृत्वावर आणि मेहनतीवर अवलंबून असते. पर्ल कपूरने २०२४ मध्ये देशातील सर्वांत तरुण अब्जाधीश होऊन हेच सिद्ध केले होते, तेव्हापासून त्याचं नाव चर्चेत आलं.**

पर्ल कपूर



## ‘कायव्हेक्स’ची घोषणा

पर्ल कपूरने मागच्या वर्षी ‘कायव्हेक्स’ (Kyvex) नावाच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असलेल्या एका संगणकीय प्रणालीची घोषणा केली. ही प्रणाली विनामूल्य उपलब्ध असेल आणि चॅटजीपीटी, ‘पर्प्लेक्सिटी’सारख्या जागतिक प्लॅटफॉर्मना टक्कर देईल असं त्याने सांगितलं होतं.

## लंडनमधून शिक्षण

पर्ल कपूरने लंडनच्या ‘क्वीन मेरी युनिव्हर्सिटी’मधून एम.एस्सी. इन्व्हेस्टमेंट बँकिंग केले आहे. वेब-थ्री तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील एक नवोदित म्हणून त्याची ओळख आहे. ‘झायबर-३६५’च्या आधी पर्लने ‘एएमपीएम’ स्टोअरमध्ये आर्थिक सल्लागार आणि ‘एन्टायर सोल्युशन्स’साठी व्यवसाय सल्लागार म्हणून काम केले होते. फेब्रुवारी २०२२ मध्ये त्यांनी बिलियन पे टेक्नॉलॉजीज् प्रायव्हेट लिमिटेडचा पाया घातला. पर्ल कपूरने अशा भविष्याची कल्पना केली आहे, जिथे ब्लॉकचेन, एआय आणि सायबर सुरक्षा यांसारखे तंत्रज्ञान एकाच ठिकाणी उपलब्ध होतील. याला ‘ग्लोबलायझेशन ३.०’ असे म्हणतात.

## ‘झायबर ३६५’ची सुरुवात

- मे २०२३ मध्ये पर्लने झायबर-३६५ नावाची सायबर सुरक्षा कंपनी सुरू केली.
- या कंपनीने स्थापनेपासून तीन महिन्यांत ९,८४० कोटी रुपयांचे बाजारमूल्य गाठले.
- याचा परिणाम म्हणजे, पर्ल कपूरने देशातील सर्वांत तरुण अब्जाधीशांमध्ये आपले नाव नोंदवले. वयाच्या २७ व्या वर्षी भारतातील सर्वांत तरुण अब्जाधीश होण्याचा मान त्याला मिळाला.

## कंपनीचे यश

- ‘स्क्रॅम अँड म्रॅम ग्रुप’कडून १०० दशलक्ष डॉलर्सचा निधी मिळवल्यानंतर कंपनीचे मूल्यांकन १.२ अब्ज डॉलर्स झाले.
- अवघ्या तीन महिन्यांत त्याच्या ‘झायबर-३६५’ या ‘स्टार्टअप’ला युनिकॉर्नचा दर्जा मिळाला.
- या कंपनीचे मुख्यालय लंडनमध्ये आहे आणि कामकाज अहमदाबादमधूनही चालते.
- भारत आणि आशियातील सर्वांत वेगाने वाढणारी युनिकॉर्न कंपनी म्हणून याकडे पाहिले जाते. तिचे मूल्य १.२ अब्ज डॉलर (९,८४० कोटी) आहे.
- पर्ल झायबर ३६५ चा संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आहे. त्याची एकूण संपत्ती १.१ अब्ज डॉलर आहे. त्याच्याकडे कंपनीचे ९० टक्के शेअर्स आहेत.

? ३) ‘How I Taught My Grandmother to Read’ हे पुस्तक कोणाचे आहे?

✔ १) वयाच्या २७ व्या वर्षी अब्जाधीश झालेली सर्वांत तरुण व्यक्ती पर्ल कपूर आहे.

# संस्कार

## सुभाषित

**पापान्निवारयति योजयते हिताय**
**गुह्यं निगूहति गुणान् प्रकटीकरोति ।**
**आपद्गतं च न जहाति ददाति काले**
**सन्मित्रलक्षणमिदं निगदन्ति सन्तः ।।**

जो आपल्या मित्राला पापांपासून वाचवतो, त्याचे हित साधतो, त्याची गुपिते राखतो, त्याच्या गुणांना प्रसिद्ध करतो, संकटसमयी त्याला सोडून जात नाही, वेळेवर त्याच्या उपयोगी पडतो, तो चांगला मित्र आहे, असे संत म्हणतात.

## सुविचार

शिस्त म्हणजे आत्मविकासाचा पाया.

## गीता श्लोक

**पत्रं पुष्पं फलं तोयं ये मे भक्त्या प्रयच्छति ।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥**

जो भक्त मला प्रेमाने पान, फूल, फळ, पाणी इत्यादी अर्पण करतो, त्या शुद्ध बुद्धीच्या व निष्काम प्रेम असलेल्या भक्ताने अर्पण केलेले पान, फूल इत्यादी गोष्टी मी सगुण रूपाने प्रकट होऊन मोठ्या प्रीतीने ग्रहण करतो.

## दिनविशेष



**१७ एप्रिल**

**२००१ :** अफवांच्या अर्थशास्त्राचा सिद्धांत मांडणारे प्रा. अभिजित बॅनर्जी यांना पहिला 'माल्कम आदिशेषय्या पुरस्कार' जाहीर.



**१८ एप्रिल**

**२००१ :** भूसंलग्न उपग्रह प्रक्षेपक 'जीएसएलव्ही-डी-१' वाहकाचे श्रीहरिकोटा येथील तळावरून यशस्वी प्रक्षेपण.




**२१ एप्रिल**

**१९३२ :** नाशिकच्या काळा राम मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी खुले करण्यात आले.

## बोधकथा

प्रशांत सरुडकर



# झाडे लावू, झाडे जगवू!

**डोंगररांगांचा परिसर वृक्षतोडीमुळे उजाड बनला होता. तिथे पक्ष्यांचा राजा- कलापी नावाचा मोर राहत होता. उन्हाळ्याचे दिवस होते. एके दिवशी त्याला खूप तहान लागली. तो झऱ्याजवळ गेला व म्हणाला, ''निर्झरा मित्रा, मला तहान लागली आहे. पाणी दे.''** झरा म्हणाला, ''डोंगररांगावरून पाणी खाली आलेच नाही. माझ्याजवळचे पाणी संपले, मी काय करू!'' कलापी धावतच डोंगराकडे गेला व म्हणाला, ''डोंगरदादा, सर्व परिसर तहानलेला आहे पाणी दे. डोंगर म्हणाला, ''मित्रा, ढगातूनच पाणी आले नाही. मी कुठून देणार? माझ्याजवळ पाण्याचा थेंबही नाही.'' कलापी उंच डोंगरावर गेला व ढगाकडे तोंड करून म्हणाला, ''ढगदादा, पाणी दे.'' ढग म्हणाला, ''माझ्याकडे भरपूर पाणी आहे, पण माणसांनी झाडे तोडली. झाडांनी मला अडवले, तर मी सर्वांना पाणी देतो, नाही तर वाऱ्यामुळे मला तसेच पुढे निघून जावे लागते.''

जंगलात दुष्काळ का पडला? याचे खरे कारण कलापीच्या लक्षात आले. तो धावतच वृक्षतोड करणाऱ्या माणसाजवळ गेला व म्हणाला, ''तुम्ही झाडे तोडली. पाऊस गेला. झाडे तोडू नका.'' यावर माणसे म्हणाली, ''झाडे विकून आम्हाला पैसे मिळतात. आमच्या अन्नाचा प्रश्न मिटतो. आम्हाला वृक्षतोड थांबवता येणार नाही.''

पुन्हा दोन दिवसांनी माणसांची झुंड हातात कुऱ्हाडी घेऊन येताना त्याला दिसली. त्यांनी पाणी पिण्यासाठी गावातून माठ भरून आणले होते. कलापीने सर्व पक्ष्यांना एकत्र करून माठ फोडून टाकले. मग पाण्याचा शोध त्यांनी सुरू केला. झरे, ओढे, नदीत पाण्याचा थेंब नव्हता. माणसांच्या लक्षात आले या दुष्काळाला आपणच कारणीभूत आहोत. त्यांनी कुऱ्हाडी खाली ठेवल्या व म्हणाले, ''इथून पुढे वृक्षतोड करणार नाही. दुष्काळाला निमंत्रण देणार नाही.'' वृक्षतोड थांबली. झाडांनी ढगांना घट्ट पकडले व धो-धो पाऊस कोसळू लागला.

## गुड मॅनर्स

# महत्त्वाच्या कागदपत्रांची निगा



**दोस्तांनो, महत्त्वाच्या कागदपत्रांचं तुम्ही काय करता? आता तुम्ही म्हणाल की आम्हा मुलांना कुठे लागतात, महत्त्वाची कागदपत्रे? मात्र, हा गैरसमज डोक्यातून एकदम काढून टाका बरं का! तुमचे निकाल, चाचणी परीक्षांचे पेपर, शाळेची महत्त्वाची नोटीस, आधार कार्ड, शाळेचं ओळखपत्र, दाखला... अशा कित्येक गोष्टी तुम्हा मुलांसाठी महत्त्वाच्या असतात.**


शाळेतून अभ्यासपत्रिका, संपूर्ण वर्षाचे नियोजन... अशा काही गोष्टी दिल्या जातात. त्याही तुम्हा मुलांसाठी महत्त्वाच्या असतात व त्या वर्षभर सांभाळायच्या असतात. तुम्ही त्या नीट जपून ठेवता का? ठेवत असाल, तर उत्तम सवय आहे. मात्र, नसेल तर आतापासून स्वतःला तशी सवय लावा. तुमच्या कप्प्यात किंवा ड्रॉवरमध्ये एक फाइल तयार करा. फोल्डर केलं तरी चालेल. त्यात तुमची महत्त्वाची कागदपत्रे ठेवा. वर्षभरानंतर जी कामाची नसतील, ती काढून टाका. तुमचं आधार कार्ड, शाळेचं ओळखपत्र, बँकेचं खातं असल्यास त्याचं पासबुक, या वस्तू ठेवण्यासाठी एखादं छोटं फोल्डर किंवा पाऊच घ्या. त्यात अशा सर्व वस्तू एकत्रित ठेवा. आई-बाबांच्या मदतीने ते फोल्डर नीट लावून घ्या.

आधार कार्डसारख्या महत्त्वाच्या दस्तावेजाच्या ४-५ झेरॉक्स काढून त्याही त्या फाइलला लावून ठेवा. दहावी किंवा त्यानंतरच्या परीक्षांसाठी 'हॉल तिकीट'ही तितकंच महत्त्वाचं असतं. ते परीक्षा संपून निकाल लागेपर्यंत जपून ठेवा. त्यासाठी व्यवस्थितपणे आपली कागदपत्रे जपण्याची सवय आतापासून लावा. याचे फायदे म्हणजे, तुमचा कोणतीही महत्त्वाचा कागद कधी हरवणार नाही आणि तुम्हाला हवं तेव्हा तो योग्य जागी बरोबर सापडेल. बघा तर करून!

## अवकाश

सदानंद होशिंग

# सप्तर्षिविचार



**सप्तर्षी तारामंडलात पुढच्या चौकोनानंतर येते, ती सप्तर्षी तारामंडलाची शेपटी. या शेपटीमध्ये तीन तारे आहेत. यातील वसिष्ठ या ताऱ्याविषयी आणि त्याच्या जवळ असणाऱ्या अरुंधती ताऱ्याविषयी आपण या आधी जाणून घेतले आहे. आज आपण या शेपटीमधील उरलेला एक तारा म्हणजे अंगिरस या ताऱ्याविषयी जाणून घेणार आहोत.**

अंगिरस ताऱ्याला इंग्रजीमध्ये ऐलियोथ असे म्हणतात. हा तारा पृथ्वीपासून सुमारे ८१ प्रकाशवर्षे दूर आहे. पृथ्वीवरून दिसणाऱ्या ताऱ्यांपैकी ३३ वा सर्वांत प्रकाशमान तारा आहे. याचे साक्षेप कांतिमान हे १.७६ मॅग्निट्युड इतके आहे. अंगिरस या ताऱ्याचे शास्त्रीय नाव हे 'एप्सिलन अर्से मॅजोरिस' असे आहे.

अंगिरस हा एक उपदानव तारा आहे. तो A0pCr या श्रेणीतील तारा आहे. या ताऱ्याचे तापमान हे ९४०० केल्विन इतके आहे. हा तारा सूर्यापेक्षा खूप मोठा आहे. अंगिरसचे द्रव्यमान हे सूर्याच्या द्रव्यमानापेक्षा ३ पट जास्त आहे. याचा व्यासदेखील सूर्याच्या व्यासापेक्षा ३.७ पट मोठा आहे. याचे निरपेक्ष कांतिमानदेखील सूर्याच्या निरपेक्ष कांतिमानापेक्षा १०८ पट मोठे आहे. अंगिरस हा तारा एक गॅस दानव तारा समजला जातो. या ताऱ्याचे चुंबकीय क्षेत्रदेखील खूप मोठे आहे. तसा हा तारा संपूर्ण वर्षभर दिसतो, पण फेब्रुवारी ते जुलैदरम्यान तो जास्त चमकदार दिसतो.

पौराणिक कथेनुसार अंगिरस हे ब्रह्माचे मानसपुत्र समजले जातात. ते अग्नीचे उपासक मानले जातात. ऋग्वेदातील अनेक ऋचांचे विशेषतः पवमान मंडलाचे ते जनक मानले जातात.

## योग जीवन

मनाली देव

# विश्वमित्रासन

**हे दंड स्थितीतील तोलात्मक आसन आहे. या आसनाला विश्वामित्र ऋषींचे नाव दिले आहे. हे तोलात्मक आसन असून योग्य मार्गदर्शन व योग्य सरावाने ते उत्तमरीत्या जमू लागते.**

### असे करावे आसन

- प्रथम सूर्यनमस्काराच्या चौथ्या स्थितीमध्ये म्हणजेच हस्तपादासनामध्ये यावे. त्यानंतर डावा पाय डाव्या बाजूने पुढे घ्यावा व तो गुडघ्यात वाकवावा.
- उजव्या हातावर जोर देत शरीर उजव्या बाजूला वळवावे. त्यानंतर डाव्या हाताने उजव्या पायाचा अंगठा किंवा घोटा पकडावा.
- त्यानंतर हात डोक्याच्या दिशेने घेऊन वरच्या दिशेने ताणून घ्यावा. पाय गुडघ्यामध्ये ताठ असावा.
- छायाचित्रात दाखवल्याप्रमाणे आसनस्थिती घेण्याचा प्रयत्न करावा. जेवढा वेळ स्थितीमध्ये स्थिर राहता येईल, तेवढा वेळ स्थिर राहवे.
- शरीराची 'अलाइनमेंट'ही व्यवस्थित असणे अपेक्षित आहे. हातावर जास्त वेळ वजन तोलण्याचा प्रयत्न करावा. परंतु, हात थरथरू लागला तर आसन सावकाश सोडावे.
- दुसऱ्या बाजूनेसुद्धा याचप्रमाणे करण्याचा प्रयत्न करावा.

### लाभ

- या आसनाच्या नियमित सरावाने हातांची ताकद तर वाढतेच, पण पायातील लवचिकपणासुद्धा वाढतो. रक्तप्रवाह सुधारतो.




**काळजी :**

- हाताला काही दुखापत झाली असेल, तर त्या हातावर आसन करू नये.

## वाचू आनंदे

# गट्टी शब्दांची- हसतखेळत शिकू या भाषा!

मराठी ही आपल्यापैकी बहुतेकांची मातृभाषा. लहानपणापासून मराठी बोलत असल्यामुळे ही भाषा आपल्याला उत्तम येते, असाच आपला समज असतो. पण कित्येक जणांच्या बाबतीत हे खरे नसते. नेहमीच्या बोलण्यात वापरले न जाणारे कित्येक मराठी शब्द आपल्याला माहितीच नसतात. एखादा नवीन शब्द कळल्यावर आपल्याला मजा वाटतेच, पण आपल्याच भाषेचे सौंदर्य आपल्याला नव्याने कळते. तीच गोष्ट आपण शाळेत शिकत असलेल्या इंग्लिश, हिंदीची आणि अधूनमधून कानावर पडणाऱ्या इतर भाषांचीही. प्रामुख्याने मराठीसह इतरही भाषांचे सौंदर्य दाखवणारे लहान मुलांसाठी लिहिलेले एक पुस्तक आहे- 'गट्टी शब्दांची- हसतखेळत शिकू या भाषा!' डॉ. नीलिमा गुंडी यांनी लिहिलेले हे पुस्तक विश्वास प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. या पुस्तकात नवीन शब्द, वाक्प्रचार, एकाच शब्दाला विविध भाषांतील प्रतिशब्द, एकाच शब्दाचे अनेक अर्थ, शब्दांचे व्याकरण अशी माहिती आली आहे. परंतु ती व्याकरणाच्या पुस्तकासारखी नीरस नाही, तर गोष्टीरूपात सांगितलेली आहे. प्रत्येक गोष्टीच्या खाली घरच्या अभ्यासासाठी काही प्रश्नही दिले आहे, ते वाचनाबरोबरच सोडवता येतील. भाषा हा विषय तुम्हाला कठीण किंवा नीरस वाटत असेल, तर तुम्हाला हे पुस्तक येत्या सुट्टीत वाचण्यासाठी अत्यंत उत्तम आहे. आणि भाषा हा तुमचा आवडता विषय असेल, तर तुम्ही अगदी पटापट वाचून संपवाल!




? ८) विश्वमित्रासन हे कोणत्या स्थितीतील आसन आहे?

✔ २) शिक्षकांनी विद्यादानाचे व्रत घेतलेले असते.

# तुम्हाला माहिती आहे का?

पेटोपिया

दोस्तांनो, आपण आजवर या सदरात पाळीव प्राण्यांची पुष्कळ माहिती घेतली. ‘माणसाचा सर्वांत जवळचा मित्र’ मानल्या जाणाऱ्या कुत्र्याविषयीही खूप जाणून घेतले. आज कुत्र्यांविषयीच्या आपल्या सामान्य ज्ञानाची कसोटी लावून पाहूया. खेळूया एक ‘क्विझ’...



१) कुत्रे शेपटी का हलवतात?
अ) शरीराचे संतुलन सांभाळण्यासाठी.
ब) डास व कीटकांना दूर ठेवण्यासाठी.
क) भावना व्यक्त करण्यासाठी.

२) खालीलपैकी कोणती क्षमता कुत्र्यांमध्ये सगळ्यांत चांगली असते?
अ) दूरवरचे बघण्याची क्षमता.
ब) वास घेण्याची क्षमता.
क) चवी समजण्याची क्षमता.

३) कुत्रे नेहमी जीभ बाहेर काढून धापा टाकल्यासारखे श्‍वास घेतात. असे ते का करतात?
अ) राग आल्यामुळे.
ब) शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी.
क) आपले लक्ष वेधून घेण्यासाठी.

४) एकाहून अधिक कुत्र्यांना एकत्रितपणे इंग्लिशमध्ये काय म्हणतात?
अ) पॅक (Pack) ऑफ डॉग्स.
ब) हर्ड (Herd) ऑफ डॉग्ज.
क) फ्लॉक (Flock) ऑफ डॉग्ज.

५) पूर्ण वाढ झालेल्या कुत्र्याच्या तोंडात किती दात असतात?
अ) ३२
ब) २८
क) ४२

६) सर्वांत वेगाने पळणाऱ्या कुत्र्याची प्रजाती कोणती?
अ) ग्रेहाउंड
ब) बुलडॉग
क) लॅब्रेडॉर



७) खालीलपैकी कोणती कुत्र्यांची प्रजाती भारतीय आहे?
अ) शित्झू
ब) राजपलायम
क) बसेंजी


८) भारतीय पोलिसांना मदत करणाऱ्या कुत्र्यांमध्ये खालीलपैकी कोणते कुत्रे प्रामुख्याने दिसतात?
अ) बीगल
ब) ग्रेट डेन
क) जर्मन शेफर्ड

९) ‘पॉमरेनियन’ ही भारतात लोकप्रिय असलेली कुत्र्यांची प्रजाती कोणत्या देशातील आहे?
अ) जर्मनी व पोलंड
ब) भारत
क) ऑस्ट्रेलिया व पापुआ न्यू गिनी

१०) खालीलपैकी कोणता खाद्यपदार्थ कुत्र्यांसाठी हानिकारक असतो?
अ) दही-भात
ब) द्राक्षे
क) गाजर

### प्रश्नमंजूषेत तुम्ही कुठे?

- ९ ते १० उत्तरे बरोबर : कुत्र्यांवरील ‘तज्ज्ञ’!
- ७ ते ८ उत्तरे बरोबर : खरेखुरे श्वानप्रेमी.
- ५ ते ६ उत्तरे बरोबर : योग्य मार्गावर आहात. शिकत राहा.
- ३ ते ४ उत्तरे बरोबर : ही सुरुवात आहे! अजून खूप जाणून घ्यायचे आहे.







उत्तर : १)- क), २)- ब), ३)- ब), ४)- अ), ५)- क), ६)- अ), ७)- ब), ८)- क), ९)- अ), १०)- ब)

# झाडांवर लागलेले दिवे!

ऐकावे ते नवलच!

मित्रमैत्रिणींनो, काही ठिकाणी समुद्राच्या लाटांवर निळसर ठिणग्यांची चमचम कशी बघायला मिळते, हे पण मागील अंकात जाणून घेतले होते. या प्रक्रियेला म्हणतात- ‘बायोल्युमिनिसन्स’. त्याचा अर्थ असा, की काही सजीवांमध्ये आपल्या शरीरातून प्रकाश तयार करण्याची क्षमता असते. ही शक्ती असलेले समुद्रातील विशिष्ट सूक्ष्मजीव (फायटोप्लँक्टन) हे त्याचे एक सुंदर; पण दुर्मीळ उदाहरण आहे. ‘बायोल्युमिनिसन्स’विषयी जाणून घेताना सर्वप्रथम डोळ्यांसमोर येतात, ते मात्र काजवेच! गावाला जाताना एखाद्या झाडावर तुम्हीही प्रकाशमान काजवे पाहिले असतील. जणू निसर्गातील जिवंत शोभिवंत दिवेच! काजवे कसा तयार करतात हा प्रकाश? हे दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांची लाडकी ठिकाणे कोणती?... आज जाणून घेऊया.





### वेगळेपणा काय?

- शरीरातच प्रकाशकिरण तयार करणारी यंत्रणा आहे म्हटल्यावर प्रश्न असा पडतो, की काजवा दिवा लावून ठेवल्यासारखा सतत का चमकत नाही?
- याचे कारण असे, की काजव्याच्या शरीरात घडणारी ही प्रक्रिया प्राणवायूवरही (ऑक्सिजन) अवलंबून असते. शरीराला मिळणारा प्राणवायू काजवे नियंत्रित करतात.
- प्रकाशकिरण तयार करणाऱ्या पेशींना प्राणवायू मिळाला की प्रकाशाचा फ्लॅश निर्माण होतो व प्राणवायू कमी असताना फ्लॅश निर्माण होत नाही.
- प्रकाश नेमका केव्हा तयार करायचा याचे नियंत्रण काजव्यांकडे असल्यामुळे त्यांना अनेक फायदे होतात.
- काजवे आधी आळीच्या (लारव्हा) रूपात असतात आणि किडा म्हणून- म्हणजेच काजवा म्हणून त्यांचे आयुष्य केवळ काही आठवड्यांचे (२ ते ४ आठवडे) असते.
- शरीरात प्रकाशाचा ‘फ्लॅश’ निर्माण करण्याची शक्ती काजवे प्रामुख्याने प्रजोत्पादनासाठी जोडीदाराचे लक्ष वेधून घेण्यासाठी वापरतात.

### काय घडते?

**तुम्ही प्रयोगशाळेत कधी रसायनशास्त्राचे प्रयोग केले आहेत का?... एका परीक्षानळीत विशिष्ट रसायने, योग्य प्रमाणात घेऊन मिसळली, की त्यांची अभिक्रिया घडून येते. प्रत्येक काजवा ही जणू निसर्गाच्या प्रयोगशाळेतील एक परीक्षानळीच आहे! काजव्यांच्या शरीराच्या खालच्या भागात विशिष्ट प्रकारच्या पेशी असतात, तसेच ‘ल्युसिफेरिन’ हे एक प्रकाश निर्माण करू शकणारे रासायनिक संयुग (केमिकल कंपाउंड) असते. पण ‘ल्युसिफेरिन’ला प्रकाश निर्माण करण्यासाठी ‘ल्युसिफेरेस’ हे ‘एन्झाइम’ (विकर/उत्प्रेरक) लागते. तेही काजव्याकडे असते. ल्युसिफेरिन जेव्हा ल्युसिफेरेसच्या संपर्कात येते, तेव्हा त्याचे ऑक्सिडीभवन (ऑक्सिडेशन) होते. त्यातून ‘ऑक्सिल्युसिफेरिन’ हे संयुग तयार होते. या रासायनिक प्रक्रियेमुळे काजव्याच्या शरीराच्या खालच्या भागातून प्रकाशाचा ‘फ्लॅश’ चमकून जातो. या प्रकाशाला इंग्लिशमध्ये ‘कोल्ड लाइट’ म्हणतात.**

### पश्‍चिम घाट प्रसिद्ध

महाराष्ट्राचा पश्‍चिम घाट काजवे बघण्यासाठी उत्तम समजला जातो. पावसाळ्याच्या आधी- म्हणजे मे आणि जूनमध्ये खूप पर्यटक पश्‍चिम घाटात विविध ठिकाणी काजवे पाहायला जातात. महाराष्ट्रात काही ठिकाणी तर काजवा महोत्सवसुद्धा आयोजित केले जातात. संध्याकाळनंतर अंधार पडल्यावर इथे हजारो काजवे एकाच वेळी चमकताना बघता येतात.
ही ठिकाणे विशेष प्रसिद्ध आहेत-
- **हरिश्‍चंद्रगड** 
- **भंडारदरा**
- **कळसूबाई**
- **घाटघर**



### समस्या काय?

दोस्तांनो, निसर्गातील कोणतीही गोष्ट एकदा पर्यटकांसाठी खुली झाली, की तिथे काही ना काही समस्या निर्माण होतात. पण तुम्ही जर काजवे बघायला जाणार असाल, तर तुम्ही काजव्यांना त्रास होईल असे वागू नका. त्यासाठी हे टाळा-
- **काजव्यांचे फोटो काढायला झाडांवर टॉर्च मारणे.**
- **वनात वाहने घेऊन जाणे.**
- **खूप मोठ्या संख्येने जाऊन गोंधळ करणे.**
- **वनात कचरा टाकणे.**

? ५) महाराष्ट्राचा कोणता भाग काजव्यांसाठी प्रसिद्ध आहे?

✓ ३) ‘How I Taught My Grandmother to Read’ हे पुस्तक सुधा मूर्ती यांचे आहे.

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.



# विक्रमांची अजब दुनिया



## इतकी मोठी मोजपट्टी...

**उंची मोजण्यासाठी भिंतीपाशी उभे राहून डोक्याच्या वर सरळ रेषेत खूण करण्याची पद्धत तुम्हाला माहिती असेल. अशी खूण करून नंतर साध्या मेजरिंग टेपने उंची मोजली जाते.** पण वयानुसार जसजशी उंची वाढत जाते, तसा मेजरिंग टेप कमी पडू लागतो! अमेरिकेतील ॲली स्पॅगनोला यांनी मात्र जगातील सर्वांत मोठा मेजरिंग टेप बनवला आहे. या टेपनी चक्क २५० फूट लांबी मोजता येते. हा टेप गुंडाळून ठेवण्यासाठी ॲली यांना तितक्याच मोठ्या आकाराची केसही बनवावी लागली, तसेच टेपचे मोजमाप अचूक यावे याची खबरदारी घ्यावी लागली. ॲली यांनी यापूर्वी 'स्पेस हॉपर'वर- म्हणजे मोठ्या रबरी फुग्यावर बसून वेगात १०० मीटरचे अंतर पार करण्याचा विक्रम नोंदवला होता.



## 'स्क्वाट्स'चा विक्रम

**'स्क्वाट्स'च्या व्यायामाचे नाव तुम्ही निश्चित ऐकले असेल. त्यात व्यक्ती सरळ उभे राहून अधांतरी खुर्चीवर बसण्याची कृती करते व पुन्हा उभी राहते.** आर्मेनिया देशातील व्यायामाचे वेड असलेल्या मेरी दावत्यां यांनी स्क्वाट्सच्या व्यायामात दोन जागतिक विक्रम नोंदवले आहेत. त्यांनी एका मिनिटात ८४, तर तीन मिनिटांत १७० स्क्वाट्स पूर्ण केले. यासाठी खूप सराव आणि 'फिटनेस' लागतो. स्क्वाट्स करताना मांड्या, गुडघे, पोटऱ्या, कंबर या स्नायूंचा व्यायाम होत असतो. सवय नसताना खूप स्क्वाट्स केल्यास पाय दुखू लागतात. पण मेरी यांनी प्रशिक्षक रोमन यांच्या साह्याने नेटाने तयारी केली. तुम्हीही स्क्वाट्सचा व्यायाम करून पाहा, तुम्हाला नक्की आवडेल.

## छोटी 'डीजे'!

**'डीजे'ने लावलेल्या गाण्यांवर धमाल नाचण्याचे आकर्षण अनेक जणांना असते. त्यावरून कधी कधी मुलामुलींना आई-बाबांचा ओरडासुद्धा खावा लागतो!** जपानमध्ये ६ वर्षे १५५ दिवस इतके कमी वय असलेली एक मुलगी चक्क 'डीजे' झाली आहे. रिनोका नावाच्या या चिमुरडीने टोकियोमधील एका क्लबमध्ये १०० लोकांसमोर ७० मिनिटे डीजेचे काम केले. 'जगातील सर्वांत कमी वयाची डीजे' हा विक्रम तिच्या नावावर नोंदवला गेला. तिने व्यावसायिक डीजे वापरतात, तीच उपकरणे वापरली. वय कमी असले, तरी रिनोकाला 'डीजे' सादरीकरणाबरोबर हिप हॉप नृत्य करण्याची व स्केटबोर्ड चालवण्याचीही आवड आहे. ती हे सर्व शिकते आहे. पण सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती शाळेत दिलेला अभ्यासही वेळच्या वेळी पूर्ण करते!



## अंतराळात पहिले पाऊल



दोस्तांनो, मानव प्रथम अंतराळात गेला, त्याला नुकतीच- १२ एप्रिल १९६१ रोजी ६५ वर्षे पूर्ण झाली. रशियाचे अंतराळवीर युरी गागारिन (शेजारील छायाचित्रातील) हे 'व्होस्टोक - १' या अंतराळयानात बसून अंतराळात गेले होते आणि त्यांनी १०८ मिनिटांत पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण केली होती. नंतर ते सुखरूप पृथ्वीवर उतरले. ही एक ऐतिहासिक घटना मानली गेली. त्यानंतर २० जुलै १९६९ रोजी 'नासा'च्या (अमेरिका) 'अपोलो- ११' मोहिमेत नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. आता भारतासह अनेक देशांचे अंतराळ संशोधन उत्तम सुरू आहे. परंतु त्या काळात अंतराळात जाणे हा आजच्यापेक्षा कित्येक पटींनी अधिक अप्रूप वाटावे असा विक्रम होता.

स्क्रीन टाइम


द क्रूड्स (२०१३)



### आपण काय शिकतो?

- धैर्य म्हणजे अंगी भीतीचा लवलेश नसणे असे नव्हे! भीती वाटत असतानाही पुढे पाऊल टाकणे हे खरे धैर्य.
- कुतूहल, बुद्धी व कल्पकतेने अशक्य वाटणाऱ्या समस्यांवरही उपाय सापडतात.
- कुटुंब म्हणजे एकमेकांवर नियंत्रण ठेवणे नाही, तर एकमेकांना साथ देत पुढे जाणे.

# 'कम्फर्ट झोन'च्या बाहेर!



**दोस्तांनो, तुम्ही 'कम्फर्ट झोन' हा शब्द ऐकला असेल. आपल्याला जे आधीपासून परिचित आहे तेच करत राहावे, नेहमीपेक्षा वेगळ्या वा गैरसाईच्या गोष्टींपासून दूरच रहावे, हा दृष्टिकोन म्हणजे 'कम्फर्ट झोन'! अशीच एक काल्पनिक गोष्ट 'द क्रूड्स' या चित्रपटात मांडली आहे. खबरदारी घ्या; पण भीतीवर मात करत पुढे जा, असा संदेश ही कथा देते.**

### चित्रपटाची गोष्ट

अश्मयुगाच्या आगेमागे एका काल्पनिक कालखंडात 'ईप' ही १९ वर्षांची मुलगी व तिचे ७ जणांचे कुटुंब एका गुहेत राहत असते. काळ मोठा खडतर असतो आणि त्यांचे सर्व शेजारी काही ना काही कारणांमुळे मृत्यू पावलेले असतात. त्यामुळे ईपचे वडील अति काळजी घेऊ लागतात. घरातील कुणीही कारणाशिवाय गुहेच्या बाहेर जायचे नाही असा नियम करतात. बंडखोर ईपला मात्र हा जाच वाटतो. एकदा ती नजर चुकवून रात्री बाहेर जाते आणि तिला असा शोध लागतो, की अग्नीचा वापर करणारेही काही मानव जगात आहेत. 'गाय' नावाचा एक मुलगा तिला भेटतो आणि 'लवकरच जग पूर्णपणे बदलणार आहे,' असे सांगतो. आई-बाबांना ती सापडल्यावर ते तिला रागवतात. भूकंपामुळे ईपची गुहा नष्ट होते आणि सगळ्या कुटुंबाला उघड्यावर यावे लागते. आतापर्यंत कधीही न पाहिलेले आणि धोकादायक भासणारे जग त्यांच्यासमोर असते. भीतीदायक प्रवासाला सुरूवात होते. गाय बाहेरच्या जगाविषयी जे सांगतो, ते ईपच्या वडिलांना पटत नाही. आपले कुटुंब आपल्यापासून दूर चालले आहे, असे वाटून ते व्यथित होतात. ईप मात्र नव्याने विचार करायला शिकते. तिच्या कुतूहलाला सतत चालना मिळू लागते. जिवंत राहण्यासाठी त्यांना काय काय नवीन शिकून घ्यावे लागते? हा प्रवास त्यांना कुठे घेऊन जातो? या प्रश्नांची उत्तरे या चित्रपटात आहेत. हा चित्रपट 'जिओ हॉटस्टार'वर उपलब्ध आहे.

### चित्रपटाची वैशिष्ट्ये

इंग्लिशमध्ये या चित्रपटास निकोलस केज, एमा स्टोन, रायन रेनॉल्ड्स अशा प्रसिद्ध कलाकारांनी आवाज दिला आहे. त्यामुळे इंग्लिशमध्ये तो पहायला आणखी मजा येते. हिंदीचा पर्यायही उपलब्ध आहे. या चित्रपटाचे ॲनिमेशन रंगीबेरंगी व उत्तम आहे. त्यात शारीरिक हालचालींवर आधारित- 'स्लॅपस्टिक कॉमेडी' प्रकारचा विनोद भरपूर आहे.

माय रेसिपी

दोस्तांनो, पास्ता खूप लोकांना आवडतो; पण तो घरी करणे तितकेसे सोपे नसते. त्यात अनेक परदेशी पदार्थही वापरले जातात आणि ते प्रत्येकाकडे नसतात. आज मात्र आपण पास्ताची एक अतिशय सोपी रेसिपी बघूया. हा पास्ता चक्क प्रेशर कुकरमध्ये आणि झटपट तयार होतो. 'इटालियन' पास्तासारखी चव नसली म्हणून काय झाले?... तुम्हाला हा 'इंडियन पास्ता' नक्की आवडेल!

### प्रयोग करा

तुमच्याकडे छोटा कुकर नसेल, तर हा पदार्थ जाड बुडाच्या पातेल्यात वा पॅनमध्येही करता येईल.

# प्रेशर कुकर पास्ता

### साहित्य

१ कप भरून कोणताही पास्ता (उदा. मॅकरोनी/ फुझिली इ.), १ मोठा कांदा (चिरलेला), २ टोमॅटो (चिरून), १ कप कोणत्याही आवडीच्या भाज्या (उदा. स्वीटकॉर्न, मटार, चिरलेले गाजर, विविधरंगी ढोबळी मिरची, फरसबी इ.), २ चीज क्यूब्ज (किसून), ४ ते ५ लसूण पाकळ्या, १ हिरवी मिरची, १ मोठा चमचा टोमॅटो केचप, पाव ते अर्धा टीस्पून लाल तिखट, अर्धा टीस्पून धने पूड, पाव टीस्पून जिरे पूड, पाव टीस्पून मिरपूड, चिमूटभर हळद, चिली फ्लेक्स व ओरेगॅनोची प्रत्येकी एक छोटी पुडी (तयार पिझ्झाबरोबर या पुड्या मिळतात), मीठ, २ चमचे बटर, २ चमचे तेल.

### कृती

छोट्या आकाराचा कुकर मंद ते मध्यम आचेवर ठेवा. त्यात बटर व तेल घाला. ते गरम झाल्यावर लसूण पाकळ्या व मिरची बारीक चिरून घाला. लगेच कांदा घाला व एक मिनीट परता. लाल तिखट, मिरपूड, धने पूड, जिरे पूड, हळद, चिली फ्लेक्स, ओरेगॅनो, केचअप आणि १ टीस्पून मीठ घाला. किंचित परता. त्यात चिरलेले टोमॅटो आणि चिरलेल्या भाज्या घाला. कोरडा पास्ता व १ कप पाणी घाला. चांगले ढवळा व कुकरचे झाकण लावून मंद ते मध्यम आचेवर केवळ १ शिट्टी होऊ द्या. शिट्टी झाल्यावर लगेच आच बंद करा व १० ते १२ मिनिटे कुकरची वाफ आपलीआपण जाऊ द्या. वाफ पूर्ण गेल्यावर झाकण उघडा व गरम पास्तामध्ये किसलेले चीज घाला. पास्ताच्या उष्णतेमुळे चीज वितळेल. गरमागरमच पास्ताचा आस्वाद घ्या.

### काळजी घ्या

भाज्या चिरताना, तसेच कुकर लावताना मोठी माणसे बरोबर हवीत. कुकरची एकच शिट्टी करा. अधिक केल्यास पास्ता गाळ शिजेल.



? ४) 'जगातील सर्वात कमी वयाची डीजे' कोण?

✓ ८) विश्वमित्रासन हे दंड स्थितीतील आसन आहे.

# पापड्या, सांडगे आणि 'बाँडिंग'!

**तुम्ही तुमच्या आजी-आजोबांशी खूप-खूप गप्पा मारू शकता का?... श्रद्धाला हे अगदी अशक्य वाटत असे. एका अनुभवाने मात्र तिचा हा समज बदलला.**



श्रद्धा आणि तिची छोटी बहीण सलोनीचे आई-बाबा उत्तराखंडमध्ये एका 'ॲडव्हेंचर कँप'ला गेले होते. त्या कँपमध्ये लहान मुलांना परवानगी नसल्यामुळे श्रद्धा-सलोनीची रवानगी फलटणच्या आजीकडे झाली.

"गावात इंटरनेट कनेक्शन चांगलं नसेल आणि आजी-आजोबांशी काय बोलायचं हेच कळत नाही," या श्रद्धाच्या कुरकुरीकडे आई-बाबांनी अजिबात लक्ष दिलं नाही.

आजीकडे पहिल्याच दिवशी श्रद्धा 'बोअर' झाली होती. ती मित्रमैत्रिणींशी गप्पा मारायची तेव्हा दहावीनंतर काय करावंसं वाटतं? 'ओटीटी'वर काय नवीन? 'बीटीएस'च्या किम तेयुंगने बघ काय पोस्ट केलंय... आठवी 'ब'मधल्या रिद्धीला बहुतेक आपल्या वर्गातला रोहन आवडतो... वगैरे गोष्टी चघळल्या जात असत. 'पण आजी-आजोबांशी काय बोलणार! त्यांची जनरेशनच डिफ्रंट आहे,' असं श्रद्धाला वाटणं साहजिक होतं. आजोबांनी तिच्याशी बोलायचा प्रयत्नही केला, पण सगळं 'बोरिंग' वाटत असल्यामुळे तिने संभाषणात रस दाखवला नाही. 'हो', 'नाही', 'बरं'च्या वर ती आजी-आजोबांशी फारसं बोलत नव्हती.

## आजीचे वाळवण

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर श्रद्धाला जाग आली, ती सलोनीच्या आवाजाने. आवाजाच्या दिशेने श्रद्धा डोळे चोळत गच्चीवर आली. गच्ची स्वच्छ करून तिथे सतरंजीवर जाड प्लॅस्टिकचा कागद पसरला होता. कागदाच्या बाहेरच्या बाजूला आजी आणि दुसऱ्या बाजूला आजोबा छोट्या स्टुलवर बसले होते. दोघांच्या मध्ये मोठ्ठं पातेलं होतं आणि त्यात गरमागरम खळीसारखं काहीतरी दिसत होतं. दोन डावांनी आजी-आजोबा कागदावर पापड्या घालत होते आणि सलोनी बघत होती. श्रद्धानेही जवळ जाऊन पाहिलं- साबुदाण्याच्या गोल, सुबक पापड्या. खरंच किती क्युट दिसत होत्या! शिजवलेल्या साबुदाणा-बटाट्याच्या मिश्रणाचा छान वास येत होता. अर्ध्या वाळलेल्याच पापड्या गट्टम कराव्याशा वाटत होत्या. आजीने श्रद्धाच्या चेहऱ्यावरचे भाव वाचले. ती म्हणाली, "खाल्ल्या तरी चालतील कच्च्याच पापड्या... मस्त लागतात. पण आधी दात घासून ये बरं का!" एरवी कधीही लवकर न उठणारी श्रद्धा त्या दिवशी ऊन्हं तापू लागेपर्यंत आजी-आजोबांबरोबर गच्चीत होती. अधूनमधून तिनंही थोड्या पापड्या घातल्या, पण ते कौशल्याचं काम होतं. त्यामुळे मटकावल्याच जास्त! काल 'प्रचंड बोअर' होणाऱ्या श्रद्धाला आज बोअर झालं नव्हतं. उलट 'वाळवण' या विषयावर तिच्या आजीशी गप्पा रंगल्या.

## गप्पांना सुरुवात


पूर्वी गल्लीतल्या सगळ्या बायका एकत्र येऊन कशी एकमेकींची वाळवणं करायच्या, लहान मुलांची कशी चंगळ व्हायची, याच्या गोष्टी आजीनं सांगितल्या. शहरात त्यांच्या गॅलरीत वाळवण करण्याजोगं ऊनच यायचं नाही, शिवाय आई-बाबा दोघांनाही ऑफिस असायचं. अर्थातच पापड-पापड्या-कुरडया दुकानातूनच घरी यायच्या. आज श्रद्धाला आजीकडून अधिकाधिक जाणून घ्यावंसं वाटत होतं.

**आजीशी 'बाँडिंग'ची मस्त गोष्ट असलेले सुधा मूर्ती यांचे 'How I Taught My Grandmother to Read' हे पुस्तक तुम्ही जरूर वाचा.**

दुसऱ्या दिवशी आजीने सोपं वाळवण करायचं ठरवलं- सांडगे. मिश्र डाळी आणि मसाले एकत्र वाटून हाताने त्याचे सांडगे घालायचे. हे काम श्रद्धाबरोबर सलोनीलाही जमलं. त्यांनी आजी-आजोबांना "तुम्ही फक्त गप्पा मारायला बसा. आम्ही करतो सांडगे," असं सांगितलं. वाळवणाच्या साथीने आजी-आजोबा भरपूर गप्पा मारतात आणि त्यांना आजच्या पिढीचे किती तरी विषय माहिती आहेत, हे श्रद्धाला पहिल्यांदाच कळत होतं. त्यांनी तिला चक्क 'जेन अल्फा स्लँग' आणि 'के-पॉप' विषयी प्रश्न विचारले तेव्हा तर ती थक्क झाली. वाळवणाच्या निमित्ताने दोन पिढ्यांच्या गप्पांना सुरुवात झाली होती आणि त्या गप्पा या पुढेही वाळवणाच्या पलीकडे जाणार होत्या. आता श्रद्धाला वाटत होतं, 'आजीकडे आपल्याला 'बोअर' नाही होणार! उलट कदाचित दिवस कमीच पडतील...'

इतके दिवस आपण उगाच आजी-आजोबांना 'जुन्या पिढीचे' समजत आलो, त्यांच्याशी गप्पाच मारता येणार नाहीत असं वाटून सुट्टीत त्यांच्याकडे राहणं टाळत आलो, याची श्रद्धाला जाणीव झाली होती. 'आजीनं वाळवण काढलं नसतं, तर ही जाणीव आपल्याला झाली असती का?' असं वाटलं. तिला साबुदाण्याच्या पापड्यांना आणि सांडग्यांनाच 'थँक्यू' म्हणावंसं वाटत होतं!







# उलटा-पुलटा

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

**दोस्तांनो, आज आपण एका नवीन खेळाची माहिती घेणार आहोत. हा खेळ तुम्ही इमारतीच्या पार्किंगमध्ये किंवा थोड्या कमी जागेतही खेळू शकतात. पाहूया 'उलटा पुलटा' हा खेळ कसा खेळतात ते!**

### कृती

- या खेळासाठी गोल आखून घ्यावेत. त्यावर धावपट्ट्या आखून घ्याव्यात व खेळाडूंना गोलावर उभे करावे.
- सुरुवातीची शिट्टी झाल्यावर खेळाडूंनी उलटे पळत जावे. यामध्ये ज्या रेषेवर खेळाडू धावत आहे, त्याच्या बाहेर तो गेला, तर तो खेळाडू बाद होतो.
- जो खेळाडू प्रथम शर्यत पूर्ण करेल तो जिंकतो.
- याच पद्धतीने उलटी 'रिले रेस'देखील खेळता येते.

### कौशल्ये

- यामध्ये गोलावर आणि उलटे धावणे ही दोन्ही आव्हानात्मक कौशल्ये आहेत. यासाठी पायांची व शरीराच्या मध्य भागाची ताकद वाढते.
- समन्वय, तोल, नियंत्रण विकसित होते.



## ॲप माझे

**कोड क्लब वर्ल्ड**
(संकेतस्थळ)

## टप्प्याटप्प्याने 'कोडिंग'


code club world

कुणासाठी?
- प्रामुख्याने ९ ते १३ या वयोगटासाठी 'कोडिंग'ची तोंडओळख.
- १३ वर्षांवरील कुणासाठीही- कल्पक गंमत-प्रकल्प.

**मित्रमैत्रिणींनो, आपण मागील अंकात 'कोड फॉर लाइफ' या संकेतस्थळाविषयी जाणून घेतले होते. त्यात अगदी साध्या-साध्या कृतींमधून कोडिंगची प्राथमिक ओळख करून दिली होती. त्याच प्रकारचे दुसरे एक संकेतस्थळ आहे- 'कोड क्लब वर्ल्ड'. पुढील लिंक ब्राउझरवर टाकून ते उघडते- https://codeclubworld.org/ 'कोडिंग' या विषयाची गोडी निर्माण होण्यासाठी हे संकेतस्थळ फायदेशीर आहे.**

### संकेतस्थळावर काय काय?

- १३ वर्षांच्या खालील मुलांना पालकांचा ई-मेल वापरून 'साइन इन' करता येते, तर १३ वर्षांवरील व्यक्ती स्वत:च्या इ-मेल वरून करू शकतात.
- हे संकेतस्थळ आपले 'सर्चिंग'चे 'पॅटर्न्स'- म्हणजेच 'कूकीज्' नोंद करण्याची परवानगी मागते.
- प्रथम आपल्याला 'डिझाइन युअर अवतार' हा पर्याय दिसतो.
- स्क्रीनवर दिसणाऱ्या रोबॉटच्या चित्राला नवे रूप देण्यासाठीचा 'कोड' आपण सूचनांचे ठोकळे एकापुढे एक जोडून 'रन' करून पाहू शकतो.
- या संकेतस्थळावर 'होम', 'स्क्रॅच', 'पायथॉन' आणि 'मोअर' असे चार टप्पे आहेत. एकेक टप्पा पूर्ण केल्यावर आपल्याला 'बॅज' मिळतो.
- प्राथमिक 'कोडिंग'मध्ये 'डिझाइन टीशर्ट फॉर युअर अवतार' असे लहान लहान कोडिंग प्रकल्प आहेत.
- कोडिंगची ओळख करून देणाऱ्या प्रकल्पांची काठिण्यपातळी हळूहळू वाढत जाते.




### वापरताना...

- या संकेतस्थळावरील सुरूवातीचे प्रकल्प लहान मुलांनाही सहज सोडवता येतील. तर मोठ्या मुलांना त्यात आणखी कल्पकता आणता येईल.
- संकेतस्थळ प्रत्यक्ष वापरताना तुम्हाला काही अडचणी आल्या, तर 'हॅंपशायर लायब्ररीज्' यांनी त्याविषयी केलेले माहितीपर यूट्युब व्हिडिओज् तुम्ही जरूर पहा.
- या संकेतस्थळावरील माहिती व सूचना इंग्लिशमध्ये आहेत. तेव्हा लहान मुलांना सुरुवातीला पालकांची मदत लागेल.
- मोठ्या मुलांना पालक वा शिक्षकांची मदत घेत, मित्रांनी मिळून हे प्रकल्प सोडवता येतील.
- हे संकेतस्थळ म्हणजे व्यावसायिक कोडिंगचे शिक्षण नव्हे, तर त्यासाठीची विचारप्रक्रिया तयार करण्याची सुरूवात आहे, हे लक्षात असू द्या.

? ३) 'How I Taught My Grandmother to Read' हे पुस्तक कोणाचे आहे?

✔ १) वयाच्या २७ व्या वर्षी अब्जाधीश झालेली सर्वांत तरुण व्यक्ती पर्ल कपूर आहे.

# आई

एका लेकरासाठी झालीस तू आनंद
सुखाचे उधळले माझ्यात रंग
म्हणून....
आई मी झाले तुझ्यातच दंग!

आई मी झोपताना
तू खूप गोड म्हणते अंगाई
कितीही काम केले तरी
तुझ्या चेहऱ्यावरचे हास्य मिटत नाही

आई तू आहे माझ्या
सात जन्मांची सावली
तुझ्या एवढ्या कष्टामुळे येते
माझे मस्तक तुझ्याच पाऊली

आई, तू आहेस विश्वातील आगळी नारी!
तू आहे शिक्षणातील पहिली पायरी
त्यामुळेच आहे,
तू आहे माझ्यासाठी दुनिया सारी!

**- सिद्धी मंगवडे, आठवी,**
शारदाबाई पवार विद्यानिकेतन,
शारदानगर



## लेखनासाठी आवाहन

दोस्तांनो, आपल्या 'मुक्तपीठ' पानासाठी तुम्ही सर्व खूप उत्साहाने चित्रे पाठवत आहात. त्याबद्दल तुमचं अभिनंदन! पण मित्रांनो, आपल्या या पानात लेखनही प्रसिद्ध होते. त्यामुळे तुम्ही सर्वांनी तुमच्या कविता, लेख, निबंध, गोष्ट वगैरे लेखनसाहित्यही आवर्जून पाठवा.

**editor.sakalnie@gmail.com या ई-मेल आयडीवर 'वर्ड फाइल'मध्ये तुमचे लेखन पाठवा आणि त्यासोबत तुमचे नाव, शाळेचे नाव, इयत्ता, गाव ही माहिती लिहायला विसरू नका!**

# विद्यादानाचे व्रत घेतलेले गुरू



आपल्या सर्वांना माहीत आहे की, शिक्षक म्हणजे केवळ आठ तास 'ड्युटी' करणारा एखादा कर्मचारी नाही; तर शिक्षक हा चोवीस तास 'माणूस' घडवण्याच्या प्रक्रियेत कार्यरत असलेला ध्येयासक्त मनुष्य असतो. तो केवळ वर्गखोलीच्या चार भिंतींत भूगोल किंवा गणित शिकवत नाही, तर तो कोऱ्या करकरीत आयुष्याच्या नकाशावर आत्मविश्वासाने आपलं स्थान कसं निर्माण करायचं, हे शिकवत असतो.

खऱ्या अर्थाने पाहायचं झालं तर, एखादा विद्यार्थी जेव्हा डॉक्टर, इंजिनिअर होतो किंवा मोठ्या प्रशासकीय पदावर जातो, तेव्हा जगाला फक्त त्याचं पद आणि प्रतिष्ठा दिसते, पण त्या पदाच्या पायरीची पहिली वीट ज्या गुरुजींनी रचली, त्यांचं नाव कोणीच घेत नाही. त्यामुळे शिक्षक हा 'अदृश्य शिल्पकार' असतो, असं म्हणता येईल. तो स्वतः त्याच जुन्या खुर्चीवर बसून आणि त्याच खडूच्या धुळीत उभं राहून पुढच्या पिढीला आभाळ कवेत घ्यायचं बळ देतो. आपले शिक्षक आपल्याला केवळ अक्षरं गिरवायला शिकवत नाही, तर ते आयुष्यातील संकटांची बेरीज-वजाबाकी कशी करायची आणि शून्यातून विश्व कसं उभं करायचं, याचं समीकरण सोडवून देतात.

शिक्षक म्हणजे केवळ ज्ञानाचा महासागर नव्हे, तर ती स्वतः जळून दुसऱ्याच्या आयुष्याला प्रकाशमान करणारी 'समई' असते. एखादी यंत्रणा आपल्याला 'कसे जगावे?' हे सांगू शकेल, पण 'का जगावे?' आणि 'कोणासाठी जगावे?' हे संस्कार फक्त गुरूच देऊ शकतात. आजच्या धावपळीच्या युगात माहिती 'गूगल'वर मिळू शकते, पण 'शहाणपण' मिळवण्यासाठी आजही गुरूंच्या पायाशीच बसावं लागतं.

साने गुरुजी यांनी म्हटल्याप्रमाणे - खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे. हे प्रेम आणि ही निखळ माणुसकी पेरण्याचं काम आज शिक्षक करत आहेत. ज्या दिवशी या समाजाला आणि देशाला हे लक्षात येईल त्या दिवशी आपले राष्ट्र खऱ्या अर्थाने विश्वगुरू होईल. आपण यशाचं कितीही मोठं शिखर गाठलं, तरी त्या शिखरावर पोहोचवणारी पहिली पायरी म्हणजे आपले शिक्षक असतात. त्यांना विसरणं म्हणजे स्वतःची मुळे तोडण्यासारखं आहे. शिक्षक ही नोकरी नाही, तर ते एक पवित्र 'व्रत'. हे व्रत घेतलेल्या माझ्या सर्व गुरुजनांना माझा नमस्कार!

**- संतोष काळे, नववी,**
पी.एम.जि.प. प्रशाला, शहागड, जि.जालना

# माझ्यात लपलंय कोण?



दोस्तांनो, आज मी तुम्हाला एक नवीन भाषिक खेळ शिकवणार आहे. आपण मिळून हा खेळ खेळूया. तुम्हाला हा खेळ नक्की आवडेल. या खेळात आपण काही कोडी सोडवणार आहोत. यामुळे तुमचे शब्दभांडार वाढेल.

खेळातील कोडी सोडवण्यापूर्वी पुढील सूचना नीट वाचा - दिलेल्या शब्दाचे वाचन काळजीपूर्वक करा, त्यामध्ये लपलेले शब्द शोधा, जास्तीत जास्त शब्द शोधण्याचा प्रयत्न करा, शब्द दोन अक्षरी, तीन अक्षरी, चार अक्षरीही असू शकतात, तुम्ही शोधलेले शब्द तुमच्या शिक्षकांकडून तपासून घ्या.

नमुना उदाहरण - नवरंगपूर
दोन अक्षरी शब्द - नव, रंग, पूर, नर, गर, वन, नग, वर, रग
तीन अक्षरी शब्द - नगर
चार अक्षरी शब्द - नवरंग, रंगपूर


आता तुम्ही खालील शब्द वाचा व त्यात लपलेले जास्तीत जास्त शोधा.

१) राजसिंहासन
२) अहमदनगर
३) ज्ञानरचनावाद
४) माझ्याजवळ
५) बालभारती
६) नंदनवन
७) आठवण
८) पाऊलवाट
९) रंगपंचमी
१०) केरकचरा

**- सुनता पाटील, उपशिक्षिका,**
विश्वकर्मा विद्यालय मराठी प्राथमिक, पुणे




**विश्वेश केंद्रे,** चौथी,
विद्यावर्धिनी नॅशनल स्कूल, अहमदपूर




**ग्रीष्मा राऊत,** सातवी,
श्रीराम विद्यालय, ऐरोली, नवी मुंबई



**अभिश्री खापली,** पाचवी,
बाल शिवाजी प्रायमरी स्कूल, अकोला



**दुर्गेश जगदाळे,** पाचवी,
जि.प. प्राथमिक शाळा गोळेगाव,
ता. शिरूर, जि. पुणे



**महिमा सदाफुले,** सातवी,
जि.प. कन्या प्राथमिक शाळा,
अणदूर, जि. धाराशिव



**सुचित सांबरे,** सातवी,
एलव्हीएच इंग्लिश मीडियम स्कूल,
मालेगाव, जि. नाशिक

? २) शिक्षकांनी कोणते व्रत घेतलेले असते?

✓ ४) 'जगातील सर्वात कमी वयाची डीजे' जपानमधील रिनोका ही आहे.

सकाळ

पुणे, शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ ■ पाने १२ किंमत ₹ ८

NIE NEWSPAPER IN EDUCATION


# आपली वसुंधरा!



**एकाहून एक मौल्यवान रत्ने धारण करणारी ‘वसुंधरा’ अर्थात पृथ्वी! पृथ्वी आहे म्हणून सगळ्या जगाचे आणि आपले अस्तित्त्व आहे. त्यामुळे चांगले भविष्य हवे असेल, तर पृथ्वीची काळजी घ्यावीच लागेल, हे अधोरेखित करणारा दिवस म्हणजे ‘जागतिक वसुंधरा दिन’ (२२ एप्रिल).**

## कसा सुरू झाला?

- दोस्तांनो, प्रदूषण ही आपल्याला आजच्या काळाची समस्या वाटते. पण तुम्ही जन्मला नव्हता, तेव्हाही प्रदूषणाची समस्या होतीच. ती आतापेक्षा थोडी कमी होती इतकेच! १९६९ मध्ये अमेरिकेत कॅलिफोर्नियामधील सांता बार्बरा इथे समुद्रात खूप मोठ्या प्रमाणावर तेलगळती झाली. जमिनीखालून खनिज तेल उपसून काढणाऱ्या यंत्रणेतून ३ ते ४.२ दशलक्ष गॅलन्स खनिज तेल प्रशांत महासागरात पसरले. ही समुद्राचे पाणी प्रदूषित करून जलजीवन धोक्यात आणणारी मोठी नैसर्गिक आपत्ती होती.
- अर्थात त्याच्याही आधीपासून प्रदूषणाविषयी विविध माध्यमांतून लोकांनी आवाज उठवण्यास सुरूवात केली होती. त्याच वेळी व्हिएतनाममध्ये युद्ध सुरू होते आणि त्यात अमेरिकेने भाग घेतला होता. या युद्धात होणाऱ्या हानीमुळे अमरिकेतील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर नाराज होते.
- या सर्व पार्श्वभूमीवर अमेरिकेतील एक खासदार गेलॉर्ड नेल्सन यांनी २२ एप्रिल १९७० रोजी देशपातळीवर पर्यावरणविषयक निदर्शनांचे आयोजन केले. अनेक लोकांनी त्यात सहभाग नोंदवला आणि अमेरिकेच्या सरकारने पुढे त्याची दखल घेतली.
- यातून एक प्रघात पाडला गेला. १९९० पर्यंत १४० देशांत २२ एप्रिलला वसुंधरा दिन पाळण्यात येऊ लागला आणि पृथ्वीच्या संरक्षणासाठी जनजागृती केली जाऊ लागली.

# कसा साजरा करता येईल?

## करूया कचऱ्याचे व्यवस्थापन

- मित्रमैत्रिणींनो, खरे सांगा- तुम्ही कधी घरातील कचरा भरला व टाकला आहे का?... पुष्कळदा हे काम मोठी माणसेच करतात. पण वरवर किरकोळ वाटणारे कचऱ्याचे व्यवस्थापन हा फार महत्त्वाचा विषय आहे. ओला कचरा व सुका कचरा या विलगीकरण पद्धतीबद्दल आपण शिकतो. पण ती खरेच अवलंबतो का? तुमच्या घरात ओल्या व सुक्या कचऱ्यासाठी वेगळे डबे आहेत का? असले, तरी विलगीकरणाची प्रक्रिया घरात काटेकोरपणे पाळली जाते का? या गोष्टींकडे तुम्ही फारसे लक्ष दिले नसेल, तर जरूर माहिती करून घ्या.
- अन्न व तेलकट पदार्थ भरून येणारे प्लॅस्टिकचे डबे, प्लॅस्टिक पिशव्या हे सुक्या कचऱ्यात टाकताना आपण त्यावरील तेल धुवून/पुसून टाकतो का? हे आवर्जून बघायला हवे.
- बाहेर गेल्यावर वाटेल तिथे कचरा न टाकता तो आपल्या पिशवीत भरून घरी आणणे व नंतर विलगीकरण करूनच टाकणे गरजेचे.
- प्लॅस्टिकचा वापर कमीत कमी करणे हे कचराच कमी करण्यासाठी उपयुक्त.





## ऊर्जा व इतर संसाधनांची बचत

- ऊर्जा बचतीचे महत्त्व आपण शिकतो खरे, पण अंमलात किती आणतो? एखाद्या खोलीत कुणीही नसते, तेव्हा दिवे, पंखे बंद करणे हा उपाय ऐकायला खूपच साधा वाटतो. पण अनेक लोक तेही करत नाही! आपण या वसुंधरा दिनानिमित्ताने ही सवय लावून घेऊ या.
- केवळ ऊर्जाच नाही, तर इतरही विविध नैसर्गिक संसाधने जपून वापरणे पृथ्वीसाठी आवश्यक आहे. पाणी हे त्यातील सर्वांत महत्त्वाचे संसाधन. कोणत्याही प्रकारची उधळमाधळ वाईटच!

## तुम्हाला काय सुचते?

- वसुंधरा दिनाच्या निमित्ताने तुम्ही जनजागृती करू शकता, सकारात्मक संदेश पोहोचवू शकता. पण तेवढेच पुरेसे नाही. गड, किल्ले, टेकड्या, बागा, मोकळ्या जागांची स्वच्छता करण्याचे कार्यक्रम विविध संस्था आयोजित करतात. त्यांत तुम्ही मित्रांसह सहभागी होऊ शकता.
- तुम्हाला वसुंधरेसाठी आणखी काय करावेसे वाटते? मित्रमैत्रिणी मिळून नक्की चर्चा करा. काय नवीन सुचले, ते ‘सकाळ एनआयई’ जरूर लिहून कळवा!

## झाडे लावूया

**वसुंधरा दिनाच्या निमित्ताने अनेक संस्था झाडे लावण्याचे प्रकल्प आयोजित करतात. त्यांत तुम्ही कुटुंबासह सहभागी होऊ शकता. लावलेली झाडे जगवण्यासाठीची सोय काय, हेही समजून घ्या.**